ISSN – 2277-7911
Impact Factor – 5.958

YOUNG RESEARCHER
A Multidisciplinary Peer-Reviewed Refereed Research Journal

January - 2025
Vol. 14
Special Issue
No. 1

# महिला आर्थिक सक्षमीकरण व वित्तीय साक्षरता योजना – महाराष्ट्र शासन

**योगिता काशिनाथ बागूल[1], डॉ. वैद्य संजय गोविंदराव[2]**

[1] *Ph.D. संशोधक विद्यार्थी, रा.ब.ना.बोरावके महाविद्यालय, श्रीरामपूर (स्वायत्त) जि.अहिल्यानगर*

[2] *Ph.D. मार्गदर्शक, रा.ब.ना.बोरावके महाविद्यालय, श्रीरामपूर (स्वायत्त) जि. अहिल्यानगर*

*Corresponding Author: योगिता काशिनाथ बागूल*

**DOI - 10.5281/zenodo.14880945**

**गोषवारा:**

*महाराष्ट्र राज्य शासन महिलांचे आर्थिक सक्षमीकरण करण्यासाठी विविध धोरणे राबवीत असते. महाराष्ट्र शासनाने २०१४ साली पहिले महिला सक्षमीकरण धोरण जाहीर केले. आत्तापर्यंत महाराष्ट्र राज्य शासनामार्फत २०१४, २००१ आणि २०१४ या तीन वर्षी महिला सक्षमीकरण धोरण राबविण्यात आले. या धोरणांच्या अनुषंगाने राज्यात विविध महिला आर्थिक सक्षमीकरण योजना राज्य शासनामार्फत राबविण्यात येतात. महिला सक्षमीकरण प्रक्रियेत लैगिक आरोग्य, शैक्षणिक सक्षमता, आर्थिक सक्षमता, राजकीय सक्षमता, मानसिक सक्षमता, आर्थिक बचतगट यासारख्या मुद्यांचा समावेश करण्यात येतो. महाराष्ट्र शासनामार्फत महिलांना आर्थिक स्वयंपूर्ण बनविण्यासाठी अनेक योजना वेळोवेळी राबविल्या जात असतात. या योजनांच्या माध्यमातून महिलांचे आर्थिक, राजकीय व सामाजिक सबलीकरण व्हावे व महिला प्रत्येक क्षेत्रात परिपूर्ण व्हावी या हेतूने महाराष्ट्र राज्य शासन वेळोवेळी वेगवेगळ्या योजनांची आखणी करीत असते व त्याची अंमलबजावणी करीत असते.*

***Keyword – महिला सक्षमीकरण, महाराष्ट्र शासन योजना***

**प्रस्तावना:**

महाराष्ट्र राज्य पुरोगामी आणि अग्रेसर म्हणून ओळखले जाते. प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंत अनेक विचारवंत यांनी महिला सक्षमीकरणासाठी विविध प्रयत्न केलेले दिसून येतात. त्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिराव फुले, राजश्री शाहू महाराज, महादेव गोविंद रानडे, सावित्रीबाई फुले यांनी महिला शिक्षण आणि महिला सबलीकरण याविषयी कार्य केलेले आपणास दिसून येते. महिलांनी शिक्षण घ्यावे म्हणून फुले दाम्पत्यांनी समाजाचा रोष पत्करून मुलींसाठी पुण्यात पहिली शाळा सुरू केली. त्यांच्या या कार्यातूनच आज महिला आपल्याला विविध प्रकारचे शिक्षण घेऊन सर्वच क्षेत्रात आघाडीवर असल्याचे दिसून येते. महाराष्ट्र शासनाने पुढील काळातही महिला स्त्री सक्षमीकरणाचे सामाजिक कार्य अविरत चालू ठेवले. आज महाराष्ट्रात स्त्री शिक्षणाचे आणि वेगवेगळे क्षेत्रात महिलांचे लक्षणीय कार्य दिसून येते तसेच महिलांचा सहभाग देखील वेगवेगळे क्षेत्रांमध्ये वाढलेला आपल्याला दिसून येतो मग ते राजकीय क्षेत्र असो किंवा शैक्षणिक क्षेत्र किंवा उद्योजक क्षेत्र. महिलांची राजकीय क्षेत्रातील कार्यभाग वाढावा म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना आरक्षण देण्यात आले तसेच शासकीय नोकऱ्यांमध्ये महिला आरक्षण देणारे महाराष्ट्र राज्य हे एक अग्रणी राज्य ठरलेले आहे. सरकारने महिला आर्थिक सक्षमीकरणासाठी व महिला स्वयंपूर्णतेसाठी महिला व बालविकास विभागाची स्थापना केलेली आहे. या विभागामार्फत वेगवेगळ्या महिला सबलीकरण योजना राबविण्यात येतात. महाराष्ट्र शासनाच्या इतर विभागामार्फत देखील महिलांसाठी विविध योजना राबविल्या जात असतात.

**संशोधन पद्धती:**

'महिला आर्थिक सक्षमीकरण व वित्तीय साक्षरता योजना – महाराष्ट्र शासन' या विषयावर शोधनिबंध तयार करण्यासाठी विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात येईल. अभ्यास विषयाचे स्वरूप, अभ्यासाची उद्दिष्टे व परिकल्पना विचारात घेऊन संशोधनासाठी प्रामुख्याने दुय्यम आधार सामग्रीचा वापर करण्यात येईल. आवश्यक व उपयुक्त दुय्यम आधारसामग्रीत प्रामुख्याने महिला आणि बाल कल्याण विभाग योजना माहिती, महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावरून रोजगार व बेरोजगारी अहवाल, श्रम शक्ती सहभाग दर वार्षिक अहवाल, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रमाणित नियतकालिकातून प्रकाशित शोधनिबंध, लेख, विविध संकेतस्थळावरील प्रकाशित माहिती इत्यादी माध्यमातून संकलित करण्यात आली आहे.

**साहित्याची समीक्षा:**

महिला आर्थिक सक्षमीकरण हा अनेक संशोधनाचा विषय आहे.

प्रा.डॉ.गजेंद्र कढव (फेब्रुवारी २०२०) यांनी "भारतातील महिला सक्षमीकरणाचे धोरण आणि महिलांची सद्यस्थिती" या शीर्षकाच्या त्यांच्या पेपरमध्ये स्पष्ट केले आहे की, स्वातंत्र्यपूर्वी महिलांची स्थिती व स्वातंत्र्यानंतर महिलांची आर्थिक स्थिती यामध्ये तफावत आहे. स्वातंत्र्यानंतर महिलांना अधिक सक्षम होण्यासाठी उपयुक्त संधी प्रदान करण्यात आल्या व त्याचा परिणाम म्हणून महिला विविध क्षेत्रात आपल्या कर्तुत्वाचा ठसा उमटवीत आहेत. ही समाधानाची बाब असली तरी आजसुद्धा अनेक क्षेत्रात स्त्री-पुरुष असमानता दिसून येते. जोपर्यंत हि स्त्री-पुरुष असमानता नष्ट होणार नाही तोपर्यंत महिला सक्षमीकरण धोरण यशस्वी झाले असे म्हणता येणार नाही.

नेक्स्ट IAS (२५ नोव्हेंबर २०२४), "भारतातील महिला सक्षमीकरण आणि लैगिक समानता" या शीर्षकाच्या त्यांच्या लेखात असा निष्कर्ष काढला आहे की भारत " विकसित भारत@ २०४७" या दृष्टीकोनाकडे वाटचाल करीत असताना समाजाला योग्य चालना देण्यासाठी प्रत्येक स्त्रीला राजकीय,आर्थिक,शैक्षणिक,सामाजिक,सांस्कृतिक संधी उपलब्धकरून देण्यासाठी शासन व समाजाने योग्य ते सामुहिक प्रयत्न केले पाहिजे.

सुनील झोडे यांनी आपल्या " महिला सक्षमीकरण आणि सद्यस्थिती" या शीर्षकाच्या पुस्तकात स्त्री चळवळीची वाटचाल, आजच्या समाजातील स्त्रीचे स्थान, महिला सक्षमीकरण का महत्वाचे, स्त्रीविषयक धोरणे, महिला आणि विकास या विविध पैलूंचे समग्र वर्णन केले आहे.

डॉ. जयश्री महाजन यांनी आपल्या 'महिला सक्षमीकरण' या ग्रंथात महिला सक्षमीकरणाचे वास्तव पैलूवर उहापोह करण्याचा प्रयत्न केला गेला आहे. प्रस्तुत पुस्तकात महिला सक्षमीकरण, स्त्री सक्षमीकरणाचे सामाजिक घटक, स्त्री सक्षमीकरणाचे आर्थिक घटक, स्त्री सक्षमीकरणाचे राजकीय घटक, महिला सक्षमीकरणात शासनाची भूमिका, महिला आणि कायदे, सामाजिक कायदे, हुंडा-प्रतिबंध कायदा-१९६१, कौटुंबिक न्यायालय कायदा-१९८४, सतीबंदी कायदा- १९८७ या घटकांचे सविस्तर वर्णन केले आहे. स्त्री अभ्यास संबंधित असणाऱ्या सर्वांना हा ग्रंथ उपयुक्त ठरावा अशीच या ग्रंथाची रचना केली आहे. स्त्रियांच्या प्रश्नासंदर्भात बहुतांशी प्रश्नांची विस्तृत माहिती यात दिली आहे.

डॉ. जयश्री विश्वासराव देवरे यांचे 'महिला सक्षमीकरण आणि शासकीय योजना' हे पुस्तक म्हणजे महिला सक्षमीकरण करण्यासाठीच्या सरकारी योजना याचे उत्कृष्ट उदाहरण आहे. हे पुस्तक महाराष्ट्र शासन आणि महिला सक्षमीकरण योजना यांची माहितीपूर्ण ज्ञानाची देवाणघेवाण करते.

प्रा.अभिजीत मनोहर शिंगाडे, अर्थशास्त्र विभाग, विश्वासराव रणसिंग महाविद्यालय कळंब-वालचंदनगर यांच्या प्रस्तुत संशोधनलेख 'महिला

सबलीकरण' यासंदर्भात आहे. कोणत्याही देशाच्या प्रगतीसाठी महिला सक्षम असणे व स्त्री-पुरुष समानता असणे नितांत गरजेचे असते. प्रस्तुत संशोधनातून महिला सबलीकरण म्हणजे नेमके काय करायला पाहिजे यावर प्रकाश टाकण्यात आलेला आहे. त्यामुळे महिला सबलीकरणाची संकल्पना समजून घेण्यास जनमाणसांना मदत होते. त्याचप्रमाणे या संशोधनातून भारत व महाराष्ट्रातून, केंद्र आणि राज्य पातळीवरून महिला सबलीकरणासाठी झालेल्या प्रयत्नांची व त्यांच्या परिणामांची माहिती मिळण्यास देखील मदत होते. तसेच महिला सबलीकरणामध्ये येणाऱ्या अडचणी, महिला सबलीकरणाचे मार्ग समजण्यास मदत होते.

**महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०२३-२४:**

**१. स्त्री-पुरुष प्रमाण आणि बालकांमधील मुला- मुलींचे प्रमाण:**

जनगणना २०११ नुसार, स्त्री-पुरुष प्रमाण रत्नागिरी जिल्ह्यात सर्वाधिक(१,११२) व मुंबई शहर ह्या जिल्ह्यात सर्वात कमी (८३२) होते. बालकांमधील मुला- मुलींचे प्रमाण गडचिरोली जिल्ह्यात (९६१) आणि बीड जिल्ह्यात सर्वात कमी (८०७) होते. महसूल विभागनिहाय स्त्री- पुरुष प्रमाण आणि बालकांमधील मुला- मुलींचे प्रमाण अनुक्रमे तक्ता १.१ व तक्ता १.२ मध्ये दर्शविली आहे.

**तक्ता क्र. १.१ महसूल विभागनिहाय स्त्री- पुरुष प्रमाण**




आधार: भारताचे महानिबंधक यांचे कार्यालय

**२. महसूल विभागनिहाय बालकांमधील मुला-मुलींचे प्रमाण ( ० ते ६ वर्ष ):**

**तक्ता क्र. १.२ महसूल विभागनिहाय बालकांमधील मुला-मुलींचे प्रमाण ( ० ते ६ वर्ष )**




आधार: भारताचे महानिबंधक यांचे कार्यालय

**३. साक्षरता दर:**

जनगणना १९९१ नुसार, महाराष्ट्र राज्याचा साक्षरता दर ७ वर्ष व अधिक वयोगट) ६४.९ टक्के होता व त्यात वाढ होऊन जनगणना २०११ नुसार ८२.३ टक्के झाला. जनगणना २०११ नुसार, साक्षरता दर मुंबई उपनगर जिल्ह्यात सर्वाधिक (८९.९ टक्के) आणि नंदुरबार जिल्ह्यात सर्वात कमी (६४.४ टक्के) होता. महसूल विभागातील साक्षरता दर ( ७ वर्ष व अधिक वयोगट ) खालील तक्त्यात दर्शविण्यात आला आहे.

**तक्ता क्र. १.३ महसूल विभागातील साक्षरता दर ( ७ वर्ष व अधिक वयोगट ) टक्केवारी**




आधार: भारताचे महानिबंधक यांचे कार्यालय

**४. स्त्री प्रमुख असलेली कुटुंबे:**

जनगणना २००१ आणि २०११ नुसार, महाराष्ट्र राज्यातील स्त्री प्रमुख असलेल्या कुटुंबाची संख्या अनुक्रमे १९.७६ लाख आणि २५.१२ लाख होती. जनगणना २०११ नुसार, स्त्री प्रमुख असलेल्या कुटुंबाची संख्या रत्नागिरी जिल्ह्यात सर्वाधिक (२५.३ टक्के ) आणि बीड जिल्ह्यात सर्वात कमी (६.७ टक्के) होती. महसूल विभागनिहाय स्त्री प्रमुख असलेल्या कुटुंबांची संख्या खालील तक्त्यात दर्शविली आहे.

**तक्ता क्र. १.४ महसूल विभागनिहाय स्त्री प्रमुख असलेल्या कुटुंबांची टक्केवारी**




आधार: भारताचे महानिबंधक यांचे कार्यालय

**५. कार्य सहभाग दर:**

जनगणना २०११ नुसार, कार्य सहभाग दर हा गडचिरोली जिल्ह्यात सर्वाधिक ( ५४.४५ टक्के) आणि मुंबई उपनगर जिल्ह्यात सर्वात कमी (३९.९२ टक्के) होता. महसूल विभागनिहाय कार्य सहभाग दर खालील तक्त्यात दर्शविण्यात आला आहे.

**तक्ता क्र. १.५ महसूल विभागनिहाय कार्य सहभाग दर टक्केवारी**




आधार: भारताचे महानिबंधक यांचे कार्यालय

**६. स्त्रियांचा कार्य सहभाग दर:**

जनगणना २०११ नुसार, महिला कार्य सहभाग दर हा गडचिरोली जिल्ह्यात सर्वाधिक ( ४९.०८ टक्के) आणि मुंबई उपनगर जिल्ह्यात सर्वात कमी (१८.९८ टक्के) होता. महसूल विभागनिहाय महिलांचा कार्य सहभाग दर खालील तक्त्यात दर्शविण्यात आला आहे.

**तक्ता क्र. १.६ महसूल विभागनिहायमहिला कार्य सहभाग दर टक्केवारी**




आधार: भारताचे महानिबंधक यांचे कार्यालय

वरील तक्त्यातील माहितीच्या आधारे असे निर्देशनास येते कि, महिला स्त्री- पुरुष असमानता मोठ्या प्रमाणावर दिसून येत आहे. त्यासाठी शासनाने विविध योजनांच्या माध्यमातून स्त्री सक्षमीकरण करणे आवश्यक ठरणार आहे.

**महाराष्ट्र शासन महिला आर्थिक सक्षमीकरण योजना:**

आज महिला अनेक क्षेत्रात प्रगती करत आहेत. अगदी कृषी क्षेत्रापासून अंतराळ क्षेत्रापर्यंत महिला आपले कर्तुत्व सिद्ध करीत आहेत पण दुसरीकडे ग्रामीण भागात आणि निमशहरी भागातील महिलांना रोज अनेक समस्यांचा सामना करावा लागतोय. अशा परिस्थितीत महिलांचे सक्षमीकरण आणि सबलीकरण करण्यासाठी महाराष्ट्र शासनामार्फत अनेक योजना राबविल्या जात आहेत. मुलींच्या जन्मापासून ते शिक्षण आणि विवाहानंतरही अनेक योजनांचा लाभ घेता येतो. आपण महाराष्ट्र सरकारच्या वतीने खास महिलांसाठी राबवण्यात येणाऱ्या योजनांविषयी माहिती जाणून घेऊया.

**१. महिला किसान योजना:**

अनुसूचित जातीतील चर्मकार, ढोर, होलार, मोची इत्यादी समाजातील महिलांना त्यांचे जीवनमान उंचविणे, समाजात त्यांना मानाचे स्थान प्राप्त होणे या उद्देशाने, महिलांचा' शैक्षणिक, आर्थिक सामाजिक विकास होण्यासाठी महामंडळामार्फत महिला किसान योजना राबविण्यात येते. या योजनेच्या माध्यमातून ज्या महिलांच्या नावे शेत जमिनीचा सातबाराचा उतारा आहे किंवा पती आणि पत्नी या दोघांच्या नावावर देखील सातबारा उतारा आहे किंवा फक्त पतीच्या नावावर सातबारा उतारा आहे अशा सर्व प्रकारच्या महिला लाभार्थींना पती प्रतिज्ञापत्राद्वारे आपल्या पत्नीस शेतीपूरक व्यवसाय करण्यासाठी व या शेतजमिनीच्या नावे कर्ज मंजूर घेण्यास तयार असेल अशा महिला लाभार्थीस रुपये ५००००/- पर्यंत अर्थसहाय्य महाराष्ट्र शासनाकडून दिले जाते यामध्ये रु.१००००/- अनुदान तत्त्वावर असते व उर्वरित रक्कम रु. ४००००/- कर्ज स्वरूपात पाच टक्के व्याजदराने मंजूर करण्यात येते. सदर कर्ज हे फक्त शेतीसाठी अथवा शेतीपूरक व्यवसायासाठीच देण्यात येते. महिला किसान योजना ही महिला रोजगार निर्मिती करण्यासाठी अतिशय महत्त्वाची योजना आहे. २०१२-१३ च्या आकडेवारीनुसार महाराष्ट्र शासनाकडून या योजनेसाठी ४३.५० लाख रुपये खर्च करण्यात आले आणि या योजनेचा लाभ घेणाऱ्या महिला लाभार्थी एकूण ८७ आहेत. सन २०१३-१४ मध्ये या योजनेसाठी शासनाकडून २७.२० लाख रुपये खर्च करण्यात आले आणि महिला लाभार्थ्यांची संख्या ५५ इतकी आहे. सन २०१४-१५ मध्ये या योजनेवर १८.४ लाख रुपये खर्च करण्यात आले आणि महिला लाभार्थ्यांची संख्या २८ इतकी आहे.

**२. महिला उद्योगिनी योजना:**

महिला उद्योगिनी योजना ही एक महिला उद्योजकांसाठी राबविली जाणारी महिला कौशल्य विकास प्रशिक्षण योजना आहे. या योजने अंतर्गत देशातील ग्रामीण आणि मागासलेल्या भागातील महिला उद्योजकांना विशेषतः निरक्षर महिलांना आर्थिक सहाय्य देऊन प्रोत्साहन करणे तसेच या योजनेच्या माध्यमातून महिलांना कौशल्य विकास प्रशिक्षण देणे हा महत्वपूर्ण उद्देश आहे. लघुउद्योग तयार करण्यासाठी आणि महिलांची व्यावसायिक क्षमता वाढविण्यासाठी या योजनेचा प्रारंभ केलेला आहे. या योजनेतून महिलांचे उत्पन्न वाढीस लागते. अनेक सार्वजनिक आणि खाजगी बँका उद्योगिनी योजनेत सहभागी आहेत. महिला उद्योगिनी योजनेचे महत्त्वाचे वैशिष्ट्ये म्हणजे महिलांना उदरनिर्वाहासाठी बँक आणि इतर वित्तीय संस्थांकडून कर्ज घेण्याची परवानगी

मिळते. SC आणि ST किंवा विशिष्ट वर्गातील महिलांना आर्थिक सहाय्यावर कमी व्याजदर प्रदान होतो. महिलांना भेदभाव किंवा पूर्वग्रह न ठेवता मोफत व्याज अग्रीम प्रदान केले जाते. ईडीपी कार्यक्रमाद्वारे महिला प्राप्त कर्त्यांचे यश सुनिश्चित केले जाते. या योजनेअंतर्गत ८८ मर्यादित उपक्रमांना प्रगत फायदे प्रदान झालेले आहेत. तसेच कृषी क्षेत्रातील व्यावसायिक दृष्टी असलेल्या महिलांना देखील आगाऊ रक्कम मिळत असते. या योजनेत सहभागी झालेल्या महिलांना तीन लाख रुपये पर्यंतचे कर्ज प्राप्त होते. एकूण ८८ लघु उद्योगांच्या श्रेणीत येणारे व्यवसाय महिला सुरू करू शकतात. ही योजना महिलांना व्यवसाय नियोजन, किंमत, व्यवहारता खर्च आणि बरेच काही कार्यात्मक कौशल्य देण्याचा प्रयत्न करते, कर्जाच्या रकमेवर महिलांना 30% पर्यंत सबसिडी मिळू शकते.

**३. स्वर्णिमा योजना:**

केंद्र आणि राज्य सरकार मिळून महिलांच्या कल्याणासाठी विविध योजना राबवत असते. देशातील आर्थिक दृष्ट्या मागास असलेल्या महिलांना सक्षम करण्यासाठी आणि त्यांना आपल्या पायावर उभे करण्यासाठी केंद्र सरकार व राज्य सरकार दोन्ही मिळून प्रयत्न करीत असतात. केंद्र सरकारच्या सामाजिक आणि न्याय विभागाने नवीन स्वर्णीम योजना २०२४ मध्ये सुरू केली आहे. या योजनेच्या माध्यमातून महिलांना व्यवसायासाठी ५% व्याजदर आणि दोन लाख रुपयांपर्यंत कर्ज उपलब्ध करून देण्यात येते. देशातील सामाजिक, आर्थिक मागास महिलांना स्वावलंबी बनवण्यासाठी सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाने हा कार्यक्रम सुरू केला आहे. महिलांना आर्थिक सुरक्षा देण्याच्या दृष्टीने ही योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेच्या माध्यमातून महिलांना व्यवसाय उभारण्यासाठी आर्थिक पाठबळ मिळते तसेच कृषी, लघु व्यवसाय, कारागीर, पारंपारिक तांत्रिक व्यावसायिक, वाहतूक आणि सेवा उद्योगांसाठी दोन लाखांपर्यंत कर्ज उपलब्ध होते.

**४. उद्योजक धोरण योजना:**

पुरुषांप्रमाणेच महिलांना सुद्धा प्रत्येक क्षेत्रामध्ये समान स्थान मिळावे यासाठी शासनाकडून महिलांसाठी ही कर्ज योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेमधून सुद्धा महिलांना त्यांच्या स्वतःच स्थान मिळाव यासाठी शासनाकडून योग्य ती प्रक्रिया राबविण्यात येते. या योजनेमधून महिलांना स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी २० लाखापासुन ते १ कोटी रुपयापर्यंत कर्ज उपलब्ध करून दिले जाते. ही उत्कृष्ट धोरणावर सुरू करण्यात आलेली महाराष्ट्र शासनाची महत्वपुर्ण योजना आहे.

**५. महिला समृद्धी कर्ज योजना:**

महिला समृद्धी कर्ज योजना ही महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व सहाय्य विभागाकडून विशेषतः महिलांसाठी राबविण्यात येणारी व्यावसायिक कर्ज योजना आहेमहिलांना प्रोत्साहित करण्यासाठी व . व्यवसायाला चालना देण्यासाठी ही महिला त्यांच्या या .समृद्धी कर्ज योजना काढण्यात आली आहे योजनेच्या माध्यमातून महिलांना स्वतः चा उद्योग, व्यवसाय सुरू करण्यासाठी ५ लाख ते २० लाख रुपयापर्यंत कर्ज उपलब्ध करून देण्यात येते येथे .४ % व्याजदरावर कर्ज उपलब्ध करून दिले जाते. आणि परतफेडीचा कालावधी ०३ वर्षाचा असतो .

**६. लाडकी बहिण योजना:**

महाराष्ट्र शासनामार्फत राबवली जाणारी लाडकी बहीण योजना सन १ जुलै २०२४ पासून सुरु करण्यात आली. २०२४ च्या अंतरिम अर्थसंकल्पात महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या योजनेची घोषणा केली आहे. महाविकास आघाडी सरकार च्या काळात ही योजना सुरु करण्यात आली आहे. या योजने अंतर्गत महाराष्ट्र राज्यातील महिलांना प्रति महिना १५०० रुपये मिळणार आहेत. ही योजना

महिलांना सशक्त व एक आर्थिक मदत मिळावी म्हणून शासनामार्फत सुरु करण्यात आली आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना राज्यातील महिला व मुलींना स्वावलंबी, आत्मनिर्भर करण्यासाठी तसेच महिला आणि त्यांच्यावर अवलंबून असलेल्या मुलांच्या आरोग्य आणि पोषण स्थितीत सुधारणा व्हावी या हेतूने सुरु करण्यात आलेली योजना आहे. या योजनेच्या अंतर्गत प्रत्येक वर्षी ४६००० कोटी रुपये खर्च केले जातात.

**७. शक्ती सदन योजना:**

निराधार किंवा निराश्रीत महिला उदाहरणार्थ विधवा महिला, कुटुंबाने दुर्लक्षित केलेल्या सामाजिक व आर्थिक पाठबळ नसणाऱ्या महिला, नैसर्गिक आपत्तीमध्ये नुकसान झालेल्या महिला, कुटुंबांना आधार काढून घेतलेल्या निराधार महिला, कौटुंबिक हिंसाचारात बळी पडलेल्या बेघर महिला, अनैतिक व्यापारातून सुटका केलेल्या महिला व मुली, लैंगिक शोषणाला बळी पडलेल्या महिला व मुली. अशा महिलांच्या सुरक्षितता व सक्षमीकरणासाठी केंद्र शासनाकडून 'मिशन शक्ती' हा एकात्मिक महिला सबलीकरण कार्यक्रम पंधराव्या वित्त आयोगाच्या सन २०२१ २२ ते २०२५-२६ या कालावधीमध्ये सुरू करण्यात आलेला आहे. मिशन शक्ती या योजनेअंतर्गत 'संभल' व 'सामर्थ्य' या दोन उपयोजना राबविण्यात येतात. यापैकी सामान्य उपयोजनेअंतर्गत महिलांच्या सक्षमीकरणावर भर देण्यात आला आहे. या उपयोजनेअंतर्गत पूर्वीच्या 'स्वाधार' व 'उज्वल' या दोन केंद्र पुरस्कृत योजना प्रशासकीय कारणासाठी एकत्रित करून शक्ती सदन योजना ही महिलांच्या सुरक्षिततेसाठी व सक्षमीकरणाकरता राबविण्यात येत आहे. या योजनेच्या माध्यमातून महिलांना त्यांच्या पूर्ण क्षमतेची जाणीव होईल असे वातावरण निर्माण केले जाते. ग्रामीण महिलांना कौशल्य विकास, रोजगार, डिजिटल साक्षरता, आरोग्य आणि पोषणाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी वन स्टॉक कन्वर्जन सपोर्ट सर्विसेस पुरविल्या जातात.

**८. बेटी बचाओ बेटी पढाओ योजना:**

बेटी बचाओ बेटी पढाओ या योजनेअंतर्गत महाराष्ट्रातील १६ जिल्हयांची निवड करण्यात आली असून २००१, २०११ च्या जनगणनेनुसार तसेच नोव्हेंबर, 2016 च्या प्राप्त आकडेवारीनुसार दर हजारी पुरुष बालकांमागे मुलींचा जन्मदर कमी असलेल्या जिल्हयांमध्ये सदर योजना राबविण्यात येते . महाराष्ट्रातील कोल्हापूर, सांगली, अहमदनगर, जळगांव, औरंगाबाद, जालना, बीड, बुलढाणा, वाशिम, सोलापूर, पुणे, लातूर, नाशिक, हिंगोली, उस्मानाबाद, परभणी व नांदेड या जिल्ह्यात ही योजना राबविली जात आहे. सदर योजना ही केंद्र पुरस्कृत योजना असून ही योजना राबविण्यासाठी लागणारा निधी केंद्र शासनाकडून संबधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी यांचे खाती वितरीत करण्यात येतो . बालिकेच्या समान दर्जा व शैक्षणिक प्रोत्साहानाकरिता समाजात कायमस्वरुपी संप्रेषण निर्माण करणे, समाजामध्ये घसरत चाललेल्या चाईल्ड सेक्स रेशो व मुलींच्या जन्मदरात वाढ करण्यासाठी जागृती निर्माण करणे, ज्या जिल्हयात मुलींचा जन्मदर कमी झालेला आहे अशा जिल्हा व शहरांवर अधिक लक्ष केंद्रित करुन एकात्मिक व कृतीशिल आराखडा तयार करणे,जिल्हा,तालुका व निम्नस्तरावर विविध संस्था व सेवा देणारे विभाग यांचा समन्वय घडवून आणणे. अश्या प्रकारची कार्ये या योजनेच्या माध्यमातून केली जातात.

**निष्कर्ष:**

कोणत्याही देशाची प्रगती हि तेथील लोकांच्या प्रगतीवर अवलंबून असते. कुटुंबाच्या, समुदायाच्या, राष्ट्राच्या विकासासाठी महिलांचे आर्थिक सक्षमीकरण होणे अतिशय महत्वाचे आहे.

विशेषतः भारतातील महिला सक्षमीकरण परिस्थिती पाहता केंद्र व राज्य सरकार यांना अजून कार्यकुशलतेने प्रयत्न करण्याची गरज आहे. देशाची सर्वांगीण प्रगती आणि कल्याण साधावयाचे असेल तर महिलांना पुरुषांच्या बरोबरीने अर्थव्यवस्थेत समाविष्ट करणे गरजेचे ठरेल.

भारतीय स्त्रियांचा आरोग्य, शिक्षण, आणि रोजगार क्षेत्रातील आर्थिक सक्षमीकरण दर्जा इतर विकसित देशांच्या तुलनेत कमी आहे. हा दर्जा सुधारण्यासाठी केंद्र सरकार व राज्य सरकार यांनी विविध कृती कार्यक्रम व ठोस उपाय हे आरोग्य, शिक्षण, साक्षरता, रोजगार या क्षेत्रात अधिक प्रभावीपणे राबविण्याची आवश्यकता आहे.

**संदर्भ सूची:**

1. https://www.loksatta.com स्त्री-सक्षमीकरणाच्या योजना, Written by Dr. Surekha M.Mule, Dated on April 1,2017
2. https://shodhgangotri.inflibnet.ac.in.
3. https://mscw.org.in Mahila Dhoran prarup
4. https://mr.wikipedia.org स्त्री सक्षमीकरण
5. https://www.maharashtra.gov.in युवा आणि महिला सक्षमीकरण – महाराष्ट्र शासन
6. Pudhari News, Empowering Women, Monika kshirsagar, Published by 24 Sep.2024
7. mahasocialcorner.com, Government of Maharashtra Scheme for Women, 16 August 2024
8. Press Information Bureau, महिलांची सुरक्षितता,संरक्षण आणि सक्षमीकरणाच्या उपाययोजना
9. Economic Survey of Maharashtra 2023-24
10. महिला सक्षमीकरण, Author jayashree mahajan, ISBN No. 978-19118-04-5, Published by 03 july 2023
11. महिला सक्षमीकरण आणि शासकीय योजना, Author Dr. jayashri Vishwasrao deore,ISBN No. 9781638864844
12. महिला एवं बाल विकास विभाग, महाराष्ट्र
13. https://www.myscheme.gov.in महिला सशक्तीकरण योजना
14. प्रा.डॉ.गजेंद्र कढव (फेब्रुवारी २०२०) “भारतातील महिला सक्षमीकरणाचे धोरण आणि महिलांची सद्यस्थिती”
15. नेक्स्ट IAS (२५ नोव्हेंबर २०२४), "भारतातील महिला सक्षमीकरण आणि लैंगिक समानता"
16. महिला सक्षमीकरण आणि सद्यस्थिती, Author Dr. Sunil Zode, ISBN No. 9788197446900
17. प्रा.अभिजीत मनोहर शिंगाडे, अर्थशास्त्र विभाग, विश्वासराव रणसिंग महाविद्यालय कळंब-वालचंदनगर, ‘महिला सबलीकरण’ संशोधनलेख